वर्ष-०८ | अंक-३८ | मुंबई, मंगळवार ०९ ते १५ ऑगस्ट - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

पोलीस बातमी पत्र

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 'घरोघरी तिरंगा' अभियानाचा राज्यपालां च्या हस्ते शुभारंभ

3 → कोविडछायेतील अधिवेशनांचा लेखाजोखा

भूतबाधा झाल्याच्या शंकेने आईबापाकडून मुलीला मारहाण ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## कल्याणमध्ये धोकादायक दुमजली इमारत कोसळली!

### सुदैवानं जीवितहानी नाही

कल्याण : कल्याणच्या रामबाग परिसरातील धोकादायक इमारत कोसळी. मात्र सुदैवानं यात कोणतीही जीवतहानी झाली नाही. तर दोन घरांचं किरकोळ नुकसान झालंय. तसंच इमारतीच्या मलब्यामुळे नागरिकांचा रहदारीचा रस्ताही बंद झालाय. दरम्यान, अनेक वेळा अर्ज देऊन पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांनी संपात व्यक्त केला आहे. रहदारीचा रस्ता बंद झाल्याने स्थानिक रहिवाशांना नाहक मनस्तापाला सामोरं जावं लागलंय. कल्याणमध्ये काही दिवसांपूर्वीच एक घर कोसळलं (Home collapsed) होतं. चाळीतील तळमजला अधिक 1 मजला असं घर कोसळल्यानं पतीचा मृत्यू झाला होता. तर एक महिला जखमी झाली होती. त्यानंतर पालिका प्रशासनाकडून धोकादायक इमारतींच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवातही केलेली. या कारवाईदरम्यान अर्धवट पाडकाम बंद पाडल्याचा आरोप स्थानिकांनी केला. त्यामुळे इमारतच्या तळमजल्याची भिंत कोसळून दुर्घटना घडली, असा आरोप लोकांनी केला. मात्र कोणतीही जीवितहानी न झाल्यामुळे थोडक्यात मोठा अनर्थ टळलाय.

**कारवाईचा बडगा, पण...**

कल्याण पश्चिम रामबाग मेनरोड पवनबारच्या समोर 29 जूनला पहाटे 6 वाजेच्या सुमारास तळ अधिक एक मजला असलेले चाळ टाईप घर कोसळले होते. यामध्ये 60 वर्षीय सूर्यभान काकड यांचा मृत्यू झाला. तर त्यांची पत्नी उषा काकड ही गंभीर झाली होती. या दुर्घटनेनंतर पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उचलत रामबाग परिसरातील धोकादायक इमारतीवर कारवाई सुरू केली होती. अशाच प्रकारे दुर्घटना झालेल्या चाळीला लागूनच असलेल्या एका दोन मजली इमारती वरही पालिकेने ही कारवाई केली होती. मात्र पालिका कर्मचाऱ्यांचे तोडक कारवाई करताना इमारतीचे वरचे दोन मजले पाडले आणि

### ..तर दुर्घटना टळली असती?



या संदर्भात परिसरातील नागरिकांनी कारवाई पूर्ण करणाऱ्यांची मागणी करत पालिकेला अनेक पत्र दिली होती. तरीही पालिका कर्मचारी आणि वार्ड अधिकारी या कामाकडे दुर्लक्ष केलं. पालिकेच्या या हलगर्जीपणामुळे रविवारी सायंकाळी या इमारतीचा तळमजल्याची भिंती कोसळली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र अचानक कोसळलेल्या या भिंतीमुळे दोन घरांचे किरकोळ नुकसान झाले. तर इमारतीच्या मलब्यामुळे नागरिकांचा रहदारीचा रस्ता झाला बंद झाला होता. या दुर्घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून पालिकेने कारवाई पूर्ण केली असती तर ही दुर्घटना झाली नसती, असा आरोप केले आहे

## मित्रचं बनला वैरी! गांजा पिण्याच्या वादातून एकाची हत्या

### वर्सोवा पोलीसांकडून आरोपीला अटक



क्षुल्लक वादातून मित्रानेच मित्राची हत्या केल्याची घटना मुंबईतील वर्सोवा येथे घडली आहे. गांजा पिण्याच्या वादातून मित्रानेच मित्राचा केल्याचं समोर आलं आहे. वर्सोवा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली आहे. वर्सोवा पोलिसांनी एका 22 वर्षीय तरुणाला त्याच्याच जवळच्या मित्रावर पेव्हर ब्लॉकने हल्ला करून ठार मारल्याप्रकरणी अटक केली आहे. मृताचं नाव सूरज तिवारी (वय 24 वर्ष) असं आहे. सुरजसोबत गांजा पिण्यावरुन झालेल्या वादातुन रागाच्या भरात सूरजची हत्या केल्याचं सांगितलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई येथे बस डेपोच्या आवारात 24 जुलै रोजी सकाळी एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला. ही माहिती मिळताच तात्काळ पोलीस पथक घटनास्थळी पोहचलं. यावेळी पोलिसांना एका तरुणाचा मृतदेह आढळला. मृतदेहाचे बारकाईने निरक्षण केले असता मृत इसमाच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाल्याने व्यक्तीची हत्या झाल्याचं निष्पन्न झालं. पोलिसांनी आजूबाजुच्या परिसरामध्ये चौकशी केली असता मृत तरुणाचं नांव सुरज मनोज तिवारी वय 24 वर्षे असल्याचे समजलं.

या प्रकरणात पोलिसांनी माहिती दिली आहे की, मृत सूरज तिवारी हा सुमारे दिड वर्षापूर्वी दिल्लीवरुन मुंबईत आला होता. त्याला नोकरी धंदा नसल्याने तो सातबंगला, अंधेरी पश्चिम, मुंबई परिसरातच गुरुदवारामधील लंगर किंवा इतर मोफत जेवण मिळणाऱ्या ठिकाणी जावून जेवत असे आणि फुटपाय अथवा बी.एस.टी बस डेपोच्या आवारात झोपत असे. त्याला दारू आणि गांजा पिण्याचं व्यसन होतं.'

पोलिसांनी त्याच्यासोबत असणाऱ्या साथीदारांकडे अधिक चौकशी केली असता मोनूनावाच्या साथीदाराने त्याचा खून केला असल्याचे आणि तो पळून गेला असल्याचे निष्पन्न झालं. तसेच मोनू हा काही दिवसापूर्वीच या ठिकाणी आला होता. त्यामुळे त्याचे पूर्ण नांव अथवा त्याचा पत्ता कोणालाही माहित नव्हता. मोनूलाही गांजाचं व्यसन होतं. पोलिसांनी वेगवेगळे चार पोलीस पथके तयार केली आणि मुंबईतील वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतला. लावून आरोपी मोनुकुमार शिवनारायण सिंह (वय 22) याला वर्सोवा पोलीस ठाणेच्या पोलीस पथकाने सापळा लावून शिताफीने पकडलं.

## डिलिव्हरी बॉयला डंपरने चिरडलं!

### मालाड लिंक रोडवरील अपघातात 25 वर्षीय तरुण ठार

मुंबई : ई-कॉमर्स कंपनीच्या डिलिव्हरी बॉयला डंपरने चिरडलं. मालाड लिंक रोडवर झालेल्या या अपघातामध्ये तरुणाचा जागीच जीव गेला आहे. तरुणाला चिरडल्यानंतर भरधाव डंपरचा चालक फरार झाला होता. त्यालाही अखेर अटक करण्यात आली असून गुन्हाही दाखल करण्यात आलाय. 5 ऑगस्ट रोजी सकाळी 7.20ला अपघात घडला होता. सुधीर कुमार चौधरी असं अपघातातील मृत तरुणाचं नाव आहे. सुधीर कुमार हा एक किराणा माल विक्री करणाऱ्या ई-कॉमर्स कंपनीत डिलिव्हरी बॉयचं काम करत होता. तो सामानाची डिलिव्हरी करण्यासाठी जात असतेवेळी त्याला डंपरने धडक दिली. अपघात




घडलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे (CCTV Camera) नसल्यामुळे ही धडक नेमकी कशा झाली, हे कळू शकलेलं नाही. मात्र प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी अखेर फरार डंपर चालकाला शोधून काढत त्याच्यावर अटकेची कारवाई केलीय.

**कसा घडला अपघात?**

एका बांधकाम कंपनीच्या सुरक्षारक्षकाच्या देखतच हा अपघात घडला. इनफिनीटी मॉल जवळ सुरु असलेल्या एका बांधकामाच्या ठिकाणी महेश पाटील सुरक्षा रक्षकाचं काम करतो. त्याने हा अपघात पाहिला होता. या अपघाताबद्दल पोलिसांना महेश पाटील याने माहिती दिली. त्यात महेशने हा अपघात कसा झाला आणि डंपरचालक जखमी सुधीर कुमार याला मदत न करतात कसा फरार झाला, याबाबत सांगितलं.

## मुंबईतील चोरीच्या सोन्याची यवतमाळमध्ये विक्री!




### मुंबई पोलिसांची यवतमाळमध्ये धाड, एकाला ताब्यात घेतलं

यवतमाळ : मुंबई पोलिसांनी यवतमाळमध्ये धाड टाकून एका सराफा व्यापाऱ्याला ताब्यात घेतलंय. चोरीच्या सोन्याची खरेदी केल्याप्रकरणाच्या संशयावरुन चौकशीसाठी ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे यवतमाळमधील सराफा बाजारात खळबळ माजलीय. मुंबई पोलिसांनी थेट यवतमाळमध्ये जाऊन दोन सोन्याच्या दुकानांची झाडाझडती घेतली. त्या दरम्यान, एका दुकानातील सोन्याबाबत शंका आल्यानं पोलिसांनी खबरदारी म्हणून सराफा विक्रेत्याला ताब्यात घेतलं आहे. मुंबईच्या लोकमान्य टिळक पोलीस स्थानकाच्या पथकाने ही कारवाई केली असून तब्बल चार कोटी रुपयांच्या सोने आणि चांदीच्या अपहारप्रकरणी तपास सुरु आहे. विशेष म्हणजे सराफा व्यापाऱ्याच्या नातेवाईकानेच याप्रकरणी तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करुन घेत प्राथमिक माहितीच्या आधारे थेट यवतमाळ गाठलं आणि झाडाझडती घेतली.

### मुंबई NCB ची मोठी कारवाई

## सहा दिवसांत पाच कोटींचे ड्रग्ज हस्तगत




मुंबई : मुंबईतील अंमली पदार्थ नियंत्रण विभाग अर्थात एनसीबीने ठिकठिकाणी धाड टाकत ड्रग्ज पॅडलर्सचे जाळे खिळखिळे करुन टाकले आहे. एनसीबीच्या कारवाया सुरुचत असताना देखील मोठ्या प्रमाणात ड्रग्जची तस्करी होत आहे. मुंबई NCB ने मोठी कारवाई करत तीन दिवसांत पाच कोटींचे ड्रग्ज हस्तगत केले आहे. मुंबई NCB ने गेल्या सहा दिवसांत तीन कारवाया केल्या आहेत. यात 4.950 किलो मेथाक्वॉलोन, 870 ग्रॅम हायड्रोपोनिक विड, 88 किलो चांगल्या प्रतीचा गांजा या प्रकारचे ड्रग्ज हस्तगत केले आहे. जप्त केलेल्या अंमली पदार्थांची किंमत जवळपास 5 कोटींच्या आसपास आहे. या कारवाई दरम्यान एनसीबीने दोन वाहने जप्त केली असून तीन संशयितांना देखील ताब्यात घेतले आहे.

## हिंदू महिलेचा ख्रिश्चन धर्मांतराचा धक्कादायक प्रकार.

### कर्नाटक, उत्तर प्रदेश राज्यात जसा धर्मांतर विरोधी कठोर कायदा करण्यात आला त्याच धर्तीवर महाराष्ट्रात ही तातडीने हा कायदा करण्यात यावा.

### भारतीय मानवाधिकार परिषदेचा पुढाकार




पुणे : अहमदनगर जिल्हयात एका हिंदु महिलेचे जबरदस्तीने बेकायदेशीर धर्म परिवर्तन करण्याचा धक्कादायक प्रकार पुण्याच्या भारतीय मानवधिकार परिषेदेने उघडकीस आणून या प्रकरणी दोषीवर कठोर कारवाईसाठी आणि पीडितेला न्याय देण्यासाठी लढा उभारला आहे. ख्रिश्चन धर्मात जबरदस्तीने बेकायदेशीर धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला असल्याची तक्रार अहमदनगर जिल्ह्यातील एका पिडीत महिलेने केल्यानंतर त्याची दखल घेत येथील भारतीय मानवाधिकार परिषदेने याची सखोल चौकशी करून या पिडीतेला न्याय देण्याची आणि या प्रकरणाचा पुर्नतपास करण्याची मागणी केली आहे, यासाठी कर्नाटक, उत्तर प्रदेश राज्यात जसा कठोर कायदा करण्यात आला तसा महाराष्ट्रात तातडीने करण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली. अहमदनगर जिल्ह्यात असलेल्या ब्राम्हणी येथील राहुरी तालुक्यातील या पीडित महिलेने आपल्यावर झालेल्या अत्याचाराची तक्रार येथील भारतीय मानवाधिकार परिषदेकडे केल्यानंतर या प्रकरणातील गांभीर्य ओळखून परिषदेने यासाठी सत्याशोधन समिती गठित करून या तक्रारीतील तथ्य जाणून घेतले आणि तेथील पोलिसांनी व त्या महिलेवर अत्याचार करणाऱ्यांनी बेकायदेशीर कामे केल्याचा आणि मानवी अधिकारांचे घोर उल्लंघन केले असल्याचा निष्कर्ष काढला असल्याची माहिती येथे आयोजित पत्रकार परिषदेत या परिषदेचे संचालक अविनाश मोकाशी यांनी दिली.

या वेळी संचालक अविनाश मोकाशी, चिंतन मोकाशी, विधी सल्लागार ॲड. अमित सोनवणे, सत्यशोधक समितीचे सदस्य ॲड. अरुण बनकर, प्रिती मोकाशी उपस्थित होते.

मानवाधिकारांवर धर्मांतराच्या गुन्हेगारीकरणामुळे गदा येत असून, राहुरीतील प्रकरण हे हिमनगाचे टोक आहे, असे मत अविनाश मोकाशी यांनी व्यक्त केले. राज्य सरकारनेही बेकायदेशीर धर्मांतर रोखण्यासाठी दंडात्मक कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा आणावा, अशी मागणी ॲड सोनवणे यांनी केली. याबाबत सविस्तर माहिती देतांना त्यांनी सांगितले की, कायद्याच्या योग्य प्रक्रियेनुसार निराकरण करुन न्याय देण्याची मागणी त्या महिलेकडून करण्यात आली होती. त्या आधारावर भारतीय मानवाधिकार परिषदेने मानवी हक्कांचे उघड उल्लंघन केल्याबद्दल हस्तक्षेप करण्याचा आणि कारवाई सुरू करण्याचा निर्णय घेतला. समितीने विविध कलमांतर्गत गुन्ह्यांसह मानवी हक्कांचे घोर उल्लंघन झाले आहे, असा निष्कर्ष काढला आहे. असेही अविनाश मोकाशी यांनी सांगितले.

सर्व संशयित आरोपी व्यक्ती, संस्था यांची ओळख पटवून त्यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करावा, बेकायदेशीर रूपांतरणासाठी व्यक्तींचा आणि संस्थांचा गैरवापर केला जात असून, विदेशी निधीबाबत आर्थिक स्त्रोतचा शोध घ्यावा, पीडित महिलेस आर्थिक नुकसान भरपाई देण्यात द्यावी. राज्य सरकारनेही बेकायदेशीर धर्मांतरणावर कठोर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच यासाठी उत्तर प्रदेश आणि कर्नाटक सरकारप्रमाणे कायदा लागू करावा अशीही मागणी करण्यात आली.

### सत्यशोधन समितीने काढलेले निष्कर्ष

धर्मांतराच्या विरोधात कोणतीही कायदेशीर तरतुदी नसली तरी, गुन्ह्यातील मजकुरावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. म्हणून एका हिंदू महिलेचे बेकायदेशीरपणे ख्रिश्चन धर्मांतरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला हे सष्ट होते. एका व्यक्तीने दाखल केली असली तरी चर्चचे अनेक कार्यकर्ते एका गटात आले होते आणि त्यांनी त्याच पद्धतीने अनेक स्थानिक ग्रामस्थांना त्यांचा धर्म बदलण्यासाठी बेकायदेशीरपणे प्रवृत्त केले. परिषदेच्यावतीने पडताळणी दरम्यान कमल सिंग विरुद्ध याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा गुन्हेगारी कटात आणि बाप्तिस्मा प्रक्रियेत सहभागी असलेल्या आणि सक्रियपणे उपस्थित असलेल्या सहयोगींची नावे निष्पन्न झाली. मात्र, त्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई सुरू केलेली नाही.

**धर्म परिवर्तन करणाऱ्यांची टीम दोन वाहनांतून या गावात आले होते. दखलपात्र गन्ह्या...**



या प्रकरणाचा तपास करण्याया तपास अधिकाऱ्यांवर आणि तेथील हे प्रकरण गांभीर्याने न घेण्याऱ्या वरिष्ठ पोलिस अधिकऱ्यांवर तत्काळ कारवाईची मागणी अविनाश मोकाशी यांनी केली. कोऱ्या कागदावर या महिलेची स्वाक्षरी घेतली असल्याने ही बाब गंभीर असल्याचे देखील मोकाशी यांनी नमूद केले.

परिषदेच्या समितीने हा अहवाल राष्ट्रपती राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग यासह विविध प्राधिकरणांना सादर केला आहे.

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ०९ ते १५ ऑगस्ट - २०२२

# ‘घरोघरी तिरंगा’ अभियानाचा राज्यपालांच्या हस्ते शुभारंभ

नवी दिल्ली, दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनात ‘घरोघरी तिरंगा’ अभियानाचा शुभारंभ राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आला. येथील कस्तुरबा गांधी मार्गस्थित नवीन महाराष्ट्र सदनात सकाळी राज्यपाल श्री.कोश्यारी यांच्या हस्ते ‘घरोघरी तिरंगा’ (हर घर तिरंगा) या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी माजी खासदार हरिभाऊ राठोड, राज्याचे मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, सचिव तथा आयुक्त (गुंतवणूक व राजशिष्टाचार) निवासी आयुक्त (अ.का.) डॉ.निधी पांडे, सहायक निवासी आयुक्त डॉ.राजेश आडपवार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या प्रभारी उपसंचालक (माहिती) अमरज्योत कौर अरोरा, यांच्यासह महाराष्ट्र सदन व परिचय केंद्राचे अधिकारी कर्मचारी तसेच महाराष्ट्र सदन येथे निवासी असलेले अभ्यागत मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राज्यपाल श्री.कोश्यारी यांनी ध्वज उंचावून ‘घरोघरी तिरंगा’ या अभियानाचा रितसर शुभारंभ करुन महाराष्ट्र परिचय केंद्राच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ‘घरोघरी तिरंगा’ या अभियानाला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपस्थित मुख्य सचिव श्रीवास्तव, श्रीमती पांडे यांच्यासह उपस्थितांनीही ध्वज उंचावून ‘वंदे मातरम्’, ‘भारत माता की जय’ या घोषणा दिल्या. या घोषणांनी महाराष्ट्र सदन निनादले.

दिल्लीत मराठी भाषीक लोकांची जवळपास अडीच लाख लोकसंख्या असून, हे लोक दिल्ली व परिसर क्षेत्रात वास्तव्यास आहेत. या सर्वांची नाळ महाराष्ट्राशी जुळलेली असून राज्यात साजरे केले जाणारे सण, उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम येथेही सार्वजनिकरित्या साजरे केले जातात. महाराष्ट्र शासनाच्या दिल्ली स्थित कार्यालयांच्या समन्वयातून यांना एकत्रित करुन अनेकदा कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन केले जाते. ‘घरोघरी तिरंगा’ (हर घर तिरंगा) या अभिनव उपक्रमा अंतर्गत दिल्ली स्थित विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मराठी भाषीक मान्यवरांच्या हस्ते ‘घरोघरी तिरंगा’ अभियानाचे महत्व पटवून, या अभियानाचा प्रचार-प्रसार महाराष्ट्र परिचय केंद्राच्या समाजमाध्यमांवरुन प्रसृत करण्यात येणार आहे.

# लघुशंका करताना नाग नदीत पडल्याने तरुण गेला वाहून; शोध मोहिम सुरु



नागपूर - नागपूर शहरातून वाहणाऱ्या नाग नदीच्या काठावर उभं राहून लघुशंका करने एका तरुणाला चांगलंच महागात पडले आहे. लघुशंका करताना पाय घसरल्याने युवकाचा नाग नदीमध्ये बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेची माहिती समजताच अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळ गाठून मृतदेहाचा शोध सुरू केला आहे. धंतोली परिसरात नाग नदीच्या काठावर शुभम हातमोडे हा तरुण लघुशंका करत होता. या भागातील नाग नदीची भिंत आधीच कोसळली आहे. हा तरुण नदीच्या काठावर उभा असताना अचानक काठावरील माती घसरल्याने शुभम नदीत पडला. रात्रभर झालेल्या पावसाने नदीच्या पाण्याला प्रवाह जोरात असल्याने शुभम वाहत्या पाण्यासोबत दूरपर्यंत वाहत गेला. अग्निशमन पथकाकडून शोध सुरू : शुभम नाग नदीत पडल्याचे अनेकांच्या लक्षात आले. उपस्थित असलेल्या नागरिकांनी आरडा ओरड केली. मात्र शुभम तोपर्यंत वाहून गेला होता. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. गायत्री मंदिर चौकात अग्निशमन विभागाने शुभमच्या मृतदेहाचा शोध सुरू केला आहे.

# 48 कोटींची खोटी बिले देणा ्यास अटक महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभागाची कारवाई

मुंबई, दि.7- महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागाने केलेल्या कारवाईत जी.एस.टी. ची 48 कोटी रुपयांची खोटी बिले देणाऱ्यास अटक करण्यात आली आहे.

जी. एस.टी. ची खोटी बिले देत असल्याचा संशय असलेल्या मे. विवांता मेट्ल कॉर्पोरेशन या व्यापा-यासंबंधी राज्य वस्तू व सेवा कर विभागाने विशेष तपास हाती घेतला होता. मे. विवांता मेट्ल कॉर्पोरेशनचा मालक इम्तियाझ अब्दुल रेहमान सय्यद, (वय -35 रा. चिता कॅम्प, मानखुर्द, मुंबई) याने कुठल्याही वस्तू किंवा सेवेची खरेदी-विक्री न करता सुमारे 48 कोटी किमतीच्या खोट्या बिलांवर आधारीत, सुमारे 8.70 कोटी रुपयाचे- Input Tax Credit (ITC) म्हणजेच, त्याला देय असलेल्या जी.एस.टी रकमेवर, 8.70 कोटी रुपयांची खोटी वजावट घेतली आणि याच स्वरुपाची खोटी बिले इतर कंपन्यांना जारी केली. ही रक्कम देखील सुमारे 9 कोटीच्या घरात आहे.

अस्तित्वात नसलेल्या अशा बोगस कंपन्यांकडून बिले घेऊन कर भरणे टाळणे, हा वस्तू व सेवाकर कायद्यांतर्गत गुन्हा आहे. या पार्श्वभूमीवर दि. 05 ऑगस्ट 2022 रोजी, वस्तू व सेवा कर विभागाने, इम्तियाझ अब्दुल रेहमान

# लाखनी पोलिसांनी कर्तव्यात कसूर केली; शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांचा आरोप

## लाखनी पोलिसांनी कर्तव्यात कसूर केली नसती तर, भंडारा येथे झालेले सामूहिक अत्याचार हे थांबविता आला असाता, असा आरोप शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांनी केला आहे.

भंडारा - लाखनी पोलिसांनी त्यांच्या कर्तव्यात गांभीर्य ठेवले असते तर भंडारा येथे झालेले सामूहिक अत्याचार हे थांबविता आले असते, असा आरोप शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांनी केला आहे. भंडारा जिल्ह्याच्या लाखनी पोलिसांवर झालेल्या आरोपांची भंडारा उपविभागिय पोलिस अधिकारी संजय पाटिल मार्फत चौकशी सुरु आहे. पोलीस दोषी आढळल्यास कारवाई होणार असल्याचे स्पष्ठ संकेत भंडारा पोलिस अधीक्षक लोहित मतानी यांनी दिले आहे.मनीषा कायंदेभंडारा मध्ये अत्याचार झालाच नसता - गोरेगाव येथे पीड़ित महिलेवर बलात्कार झाल्यानंतर पीड़ित महिला लाखनी पोलिस स्टेशनच्या हद्दीत असतांना पोलीस पाटलाने याची माहिती लाखनी पोलीस विभागाला दिली. लाखनी पोलिसांनी त्या महिलेला लाखनी पोलीस स्टेशनमध्ये आणले. तिथे तिची विचारपूस केली मात्र, ती कोणतीही उत्तर देत नसल्याने तीन मानसिक दबावाखाली असेल तिला आरामाची गरज आहे असं समजून तिला लाखनी पोलीस स्टेशनमध्येच ठेवण्यात आले. सकाळी तिच्याशी पुन्हा चर्चा



करून काय झालं या विषयाची माहिती घेऊ असं पोलिसांनी ठरवलं. मात्र, भल्या पहाटेच ही महिला कोणालाही न सांगता निघून गेली असल्याचं सीसीटीव्ही दिसत आहे. ही महिला आढळल्यानंतर पोलिसांनी जर गांभीर्य दाखविले असते तर, पहिल्या अत्याचाराची घटना पुढे आली नसती. पोलिसांनी काळजी घेतली असती तर ही घटना झालीच नसती असा आरोप शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांनी केला आहे. सध्या राज्यात कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या होत नसताना भंडारा येथील एसपींना राजकीय द्वेषापोटी बदली केल्याने सहा दिवस जिल्हाला पोलीस अधीक्षक नव्हते. त्यामुळेच या पोलिसांचा हलगर्जी पणा दिसत असल्याचा आरोप त्यांनी केला. उपविभागीय अधिकारी करीत आहेत चौकशी - तिच्यावर वेळेत लक्ष दिल्यास दूसरा झालेला बलात्कार टाळता आला असता असा, आरोप शिवसेना प्रवक्त्या मनीषा कायांदे यांनी केल्यावर लाखनी पोलिसांची अक्षम्य चूक समोर आली होती. प्रसार माध्यमानी हा मुद्दा धरून ठेवल्यावर लाखनी पोलिसांवर चहुबाजूने टिका होउ लागली आहे. आता नव नियुक्त पोलिस अधीक्षक लोहित मतानी यांनी हे प्रकरण अधिक गांभीर्याने घेतले असून याची चौकशी उपविभागीय अधिकाऱ्या मार्फत सुरु झाली केली आहे. यात चौकशी अंति कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे स्पष्ठ संकेत पोलिस अधिक्षक लोहित मतानी यांनी व्यक्त केले आहे.

# बुलेटवरुन आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींचा तरुणावर गोळीबार, 1 जखमी

जालना - बुलेटवरून आलेल्या 3 अज्ञातांनी तरुणावर गोळीबार केल्याची घटना परतूर तालुक्यातील हातडी येथे घडली. गोळीबारात एक तरुण जखमी झाला असून डुकरांच्या वाटणीतून हा गोळीबार झाल्याची माहिती समजली आहे. बुलेटवरून आलेल्या 3 अज्ञातांनी गावठी पिस्तुलातून तरुणावर गोळीबार केला आहे. या गोळीबारात एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. जीवन जाधव असे गोळीबारीत जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. परतुर तालुक्यातील हातडी येथे घनसावंगी तालुक्यातील कंडारी परतूर येथील जीवन जाधव नावाच्या व्यक्तीने पाळलेली डुकरे सोडलेली आहेत. आज सकाळी जीवन जाधव हा डुकरांची देखभाल करण्यासाठी हातडीत आला होता. यावेळी बुलेटवरून आलेल्या अज्ञात 3 इसमांनी त्याच्यावर गावठी पिस्तुलातून गोळया झाडल्या.या घटनेत जीवन जाधव याच्या डोक्यावर गोळया लागल्याने तो गंभीर जखमी असून, पोलिसांनी तातडीने त्याला उपचारासाठी जालना येथे हलविले आहे. या घटनेनंतर परतूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून जखमींना मदतकार्य केले. बुलेटवरून आलेले हल्लेखोर हे तिघेजण असून, ते गोळया झाडून पसार झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# 'या' चार नराधमांनी पीडितेवर अत्याचार केला, 'भंडारा' प्रकरणात माणूसकीला काळीमा फासणारे आरोपी



नागपूर: भंडारा येथे घडलेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी केलेल्या दुर्लक्षामुळे पीडितेला दुसऱ्यांदा अत्याचाराला सामोरं जावं लागल्याचं स्पष्ट झालंय. या प्रकरणात चार आरोपींनी अत्याचार केल्याचं महिलेच्या चौकशीतून समोर आलं आहे. आतापर्यंत या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी अद्याप फरार आहे.

या चार नराधमांनी पीडितेवर अत्याचार केला,

आरोपी क्र. 1 - श्रीराम ऊरकुंडे - सर्वात आधी या आरोपीने पीडितेला माहेरी सोडतो असं म्हणत तिच्यावर अत्याचार केल्याची माहिती आहे. पीडितेने या आरोपीच नाव श्रीराम ऊरकुंडे असल्याचं सांगितलंय. पण या नावाची कुठलीच व्यक्ती अस्तित्वात असल्याची माहिती मिळत नसल्याचं खुद्द भंडारा एसपी लोहित मतानी यांनी सांगितलं. पोलिसांनी या नावाच्या व्यक्तीचा तपास घेतला. पण अजून असा कुठलाच व्यक्ती सापडला नाही.

आरोपी क्र. 2 - अमित पारवे- हा तो व्यक्ती आहे ज्याने दुसऱ्या सामूहिक बलात्कारात सहभाग घेतला आणि पीडित महिलेवर अमानवीय अत्याचार करण्यात आला. अमित हा 30 वर्षांचा आहे. तो अविवाहित असून आणि भांडाऱ्याच्या लाखनी येथील रहिवासी आहे. पीडिता ही लाखनी पोलीस स्थानकातून निघाल्यावर धर्मा धाब्यावर पोहचली होती. अमित पारवे जे काम मिळेल ते काम करायचा, कधी मजुरी तर कधी धाब्यावर तर कधी पंक्चर दुकानावर तो काम करायचा. काही दिवस आधी अमित हा धर्मा धाब्यावर कामाला असल्याचं कळतंय आणि त्या दरम्यान त्याची मैत्री धाब्यासमोर असलेल्या आरोपी क्र 03 म्हणजेच पंक्चरच्या दुकानवाल्याशी झाली. त्याच्यावर या आधी कुठल्याही गुन्ह्याची माहिती नाही.

आरोपी क्र. 3 - मोहंम्मद एजाज अन्सारी- धर्मा धाब्यासमोर या व्यक्तीच पंक्चरचे दुकान आहे. अमानवीय अत्याचारात सहभागी होणारा हा 22 वर्षीय तरुण बिहारचा असल्याचं कळतंय. खरं तर हे दुकान जुनं असून हे त्याच्या सासऱ्याचं असल्याची माहिती आहे. जिथं पंक्चरचं दुकान होतं तिथंच तो राहायचा अशी ही माहिती आहे. मोहंम्मद अन्सारीला आपली पूर्ण कहाणी पीडितेने सांगितल्यावर तिथं अमित पारवे आल्याचं कळतंय. त्या पीडित महिलेसमोर अन्सारीने अमितला तिला घरी सोडून ये असं सांगण्याचं नाटक केलं. मात्र अमितने तिला घरी न नेता कान्हाडामोह गावाच्या एका शेतात नेलं आणि तिथं तिच्यावर अमानवीय अत्याचार केला. नंतर त्या ठिकाणी मोहम्मद अन्सारी पोहचला. अत्याचार झालेल्या या महिलेला नंतर या दोघांनी पुलाखाली सोडून दिलं.

आरोपी क्र. 04 - महिलेन दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या बलात्काराच्या घटनेत अजून एक व्यक्ती असल्याचं कळतंय. मात्र या प्रकरणातील पहिलाच आरोपी हा हाती न लागळयामुळे आणि त्याची ओळख न पटल्यामुळे आरोपी क्र. 04 बद्दल ही फारस काही सांगता येत नाही.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

Indira Gandhi Bhavan,Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhaindar (w.) 401101, Tal Dis-Thane
28192828.

**Woman & Child Welfare Department**

Outward No./MBK/ 111 /2021-22 — Date :- 3/ 8 /2022

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed tenders for following works in MBMC area in the form of Tendering. The tender form and other relevant documents will be available for download on http:/mahatenders.gov.in website from Dt. 5 / 8 /2022 to Dt 12 / 8 /2022 till 12.00 pm.Tender Form Fee & EMD should be submitted through online receipt system. Prequalification criteria and other terms and condition mention in tender form.

The last date for submission of tenders completed in all respects on Dt. 12 / 8 /2022 up to 1.00 pm on the above mentioned website of Mira Bhaindar Municipal Corporation. If possible the tenders shall be opened in the presence of the bidders or their representatives on the dt. 17/ 8 /2022 at 3.00 pm at the Tender cell of Mira Bhaindar Municipal Corporation. The Mira Bhaindar Municipal Corporation has reserve right to accept any bid or reject all bids without assigning any reasons.

| Sr. no. | Name of work | Cost of Tender Documents (in Rs.) | Earnest Money Deposit (EMD) (in Rs.) |
|---|---|---|---|
| | To supply Sanitary Napkin and Dettol soap big size (kit) to girls of class 7th and 8th in municipal schools. (Tender Cost Rs. 24,00,000/-) | Rs. 5100 +18% =6018 (Non Refundable) | Rs.85,000 /- |

Note:-

1. Tender Documents shall not be sent or received via Post.
2. Tender Submission is online only.
3. EMD and Document Fees shall be submitted through online receipt system available on e-tendering website.

Ref.: MBMC / PRO / 203 / 2022-23
Date : 05 / 08 / 2022

Sign/-
Dy.Commissioner
Mira Bhaindar Municipal Corporation

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०९ ते १५ ऑगस्ट - २०२२





संपादकीय...

# करिअर आणि मातृत्व

'आई होणं हा आयुष्यातला सर्वांत मोठा आनंद होय,' अभिनेत्री जुही चावला म्हणते. 'माझ्या मुलीला- वामिकाला सायकलवर मागे बसवून मी पहिली चक्कर मारली, तो माझ्या आयुष्यातला सर्वांत आनंदाचा क्षण होता,' अनुष्का म्हणते. बहुतेक सर्वच अभिनेत्री, झगमगत्या चित्रपट सृष्टीतील 'ग्लॅमरस' करिअरला ब्रेक देऊन मातृत्वाचा अनुभव आणि आनंद घेताना दिसतात. पण खरा प्रश्न आहे तो इतर अनेक म्हणजे आयटी, उद्योगविश्व, बँकिंग, जाहिरात, माध्यम अशा क्षेत्रांत करिअर करणाऱ्या आजच्या तरुण मुलींचा. त्यांचा 'मातृत्वा'कडे बघण्याचा दृष्टिकोन काय आहे, यावरच उद्याच्या कुटुंब संस्थेचं भवितव्य ठरणार आहे. नेमकं हेच जाणून घेण्यासाठी डॉ. गीतांजली राणे- घोलप यांनी पंचविशीतील काही तरुणींशी संवाद साधला.

त्यातील काही तरुणींची ही मनोगतं आहेत. वकिली करणाऱ्या नेहा सावंत- मोरे म्हणतात, "आई होणं म्हणजे कुटुंबाला पूर्णत्वाच्या आनंदाची भेट देणं. पण आजची 'फास्ट आणि करिअर ओरिएंटेड लाइफ स्टाइल' बघता स्वतःसाठी पुरेसा वेळ देता येत नाही. अशा वेळी अपत्याची अगदी शंभर टक्के जबाबदारी घ्यायची तर सगळं नीट सांभाळता येईल का, हा प्रश्न भेडसावतो."

सामाजिक क्षेत्रात काम करणारी अमृता काळहाने- शिंदे म्हणते, "आपण आपलं शिक्षण, करिअर या जबाबदाऱ्या कुटुंबाच्या साथीनं पूर्ण करू शकतो, तर मातृत्वासारखी मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी पूर्ण करण्यात कुटुंबाची साथ का मिळणार नाही? करिअरसाठी मूल न होऊ देण्याचा विचार म्हणजे स्वार्थीपणा झाला. आपल्याला सृष्टी जगवायची असेल तर मुलं होणं देखील गरजेचं आहे. मुलं ही आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत, त्याला आपण नाकारू शकत नाही."

माध्यम क्षेत्रात कार्यरत तन्वी बालिगा म्हणते, "मातृत्व ही एकट्या त्या तरुणीची जबाबदारी नसून आई-वडील अशा दोघांचीही असते. बाळामुळे करिअरला ब्रेक लागू शकतो, पण तो काही काळापुरता. परदेशात तर मोठ्या संख्येनं स्त्रिया एकल मातृत्व, करिअर करूनही निभावताना दिसतात. माझ्या मते मातृत्व ही काही यशस्वी करिअरच्या आड येणारी बाब नसावी."

जाहिरात क्षेत्रातली प्राची म्हणते, "बाळंतपण म्हणजे करिअरला स्वल्पविराम किंवा पूर्णविराम. आधी हा एवढा मोठा त्याग आणि मग त्या मुलांचं संगोपन, संस्कार, शिक्षण यासाठी लागणारा मोठा काळ आणि जबाबदारी. मातृत्व जितकं सुखद आहे तितकंच आव्हानात्मक आहे. ही गंभीर जबाबदारी मला पेलवेल का, याबाबत सध्या तरी मी साशंक आहे." या सर्वच मुली करिअरला महत्त्व देणाऱ्या असल्या तरी मातृत्व ही संकल्पना नाकारीत नाहीत. ते जितकं सुखद, तितकंच आव्हानात्मक असल्यानं ती जबाबदारी पेलण्यासाठी जोडीदाराची, परिवाराची साथ हवी, अशी मात्र त्यांची रास्त अपेक्षा आहे. अर्थात हे सारं असलं तरी ती मुख्यतः स्त्रीची जबाबदारी असल्यानं मातृत्व आणि करिअर यात समतोल साधणं जमेल का, याविषयी काहीजणी साशंक आहेत. ते स्वाभाविकच आहे, पण या साशंकतेवर त्या निश्चित मात करू शकतात, हा समतोल ज्यांनी साधला आहे, अशा स्त्रियांच्या अनुभवांवरून.. त्यातून प्रेरणा घेऊन. तशी तर असंख्य उदाहरणं आहेत, पण इथे मी एकच एक उदाहरण आवर्जून देऊ इच्छितो. निवृत्त पोलिस अधिकारी मीरा बोरवणकर यांचं. स्त्रीच्या दृष्टीनं सर्वांत आव्हानात्मक असणाऱ्या 'पोलिसिंग' क्षेत्रात धडाडीनं करिअर करत असतानाच दोन मुलांच्या मातृत्वाची जबाबदारीही त्या तितकीच उत्तम निभावू शकल्या. कामाच्या विचित्र वेळा, सततची पोलिस ऑपरेशन्स, छापे यामुळे त्यांची प्रतिमा 'झाशीची राणी' अशी झाली होती. रात्री छोट्या मुलाला पाठीशी बांधून त्या मोटरसायकलवरून गस्तीला जात, अशी वदंता होती!

• • •

# कोविडछायेतील अधिवेशनांचा लेखाजोखा



आपल्यासाठी धोरणे ठरवणारे लोकप्रतिनिधी काय काम करतात, यावर लक्ष ठेवण्याचे आपले काम मत दिल्याच्या क्षणापासून सुरू होते. 'संपर्क' या संस्थेने ते आणखी नेमकेपणाने करून मांडलेला हा लेखाजोखा-

लोकसहभागाविना लोकशाही प्रणाली व्यवहारात यशस्वी होणार नाही, असं आपण नेहमी म्हणतो. सध्या, लोकांचा सहभाग राहिला दूर, लोकप्रतिनिधींच्याच सहभागाविषयी शंका निर्माण होण्यासारखी स्थिती आहे. आपापल्या मतदारसंघातली नागरी कामं करवून घेणं, लोकांना वेळोवेळी भेडसावणाऱ्या अडचणी स्वतःचं वजन वापरून दूर करणं, कुणाची सरकारदरबारी अडलेली कामं करून देणं, ही लोकप्रतिनिधींची मुख्य कामं नव्हेत, हे सांगायची वेळ आली आहे. (कोविडसंकटात सर्वच लोकप्रतिनिधींनी, अगदी रस्त्यावर उतरून गरजूंना अन्न, पाणी, निवारा, आरोग्यसेवा, काही ठिकाणी आर्थिक मदतदेखील देऊ केली. आणि या कामाची नोंद ठेवायलाच हवी. पण ही अपवादाची स्थिती होती. त्याचबरोबर, कोविडसंकटाचे काही मोठे परिणाम धोरणविषयक कामकाजावर झाले, आणि ते दीर्घकाळ टिकणार आहेत, हेही लक्षात घ्यायला हवं.)

जनतेच्या हिताचे कायदे तयार करणं, कायद्यांमध्ये वेळोवेळी सुधारणा करणं, त्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणं, या संदर्भात सत्ताधारी आणि विरोधी पक्षप्रतिनिधींनी विधानसभेत चर्चा करणं आणि धोरणाला योग्य आकार देणं, ही विधिमंडळाची वैधानिक जबाबदारी आहे. ते करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास, विविध प्रश्न, चर्चा, सूचना अशी आयुधं उपलब्ध असतात. पण, दिवसेंदिवस राज्याराज्यांतली विधिमंडळं (आणि संसददेखील) निष्प्रभ होत चालली आहेत. तिथले कामकाजाचे दिवस कमी-कमी होत चाललेत. अधिवेशनं भरली तरी, तिथे लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा होत नाही, होऊ दिली जात नाही. तिथल्या प्रक्रियांना वळसा घालून मोठे निर्णय घेतले जातात. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात शत्रुत्व तयार झाल्याचं वातावरण आहे. म्हणजेच, आमदार-खासदार फक्त 'उरलो स्वतःच्या मतदारसंघापुरते' असंच वाटावं, अशी ही स्थिती.

महाराष्ट्रात सध्याचं चित्र काय आहे? विधानसभेत २८८ आमदार अस्तित्वात आहेत. पण त्यांनाही विधानसभा अधिवेशन कधी होणार, माहीत नाही. अधिवेशन नसल्याने या आमदारांनी सभागृहात चर्चा केल्याविनाच अनेक निर्णय घेतले जात आहेत.

महिन्याभरात ७५१ शासकीय आदेश प्रसृत केले गेल्याची बातमी आहे. या निर्णयप्रक्रियेत २८८ आमदार कुठे होते? लोकशाही शासनव्यवस्थेत लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी लोकांना उत्तरदायी असतात. हे तथ्य केवळ कागदोपत्री, संविधानामध्ये न राहता किती प्रमाणात व्यवहारात उतरतं, यावर लोकशाही प्रणालीचं यश अवलंबून असतं. लोकप्रतिनिधींच्या सहभागाविनाच निर्णय घेतले जात असतील, तर लोकांच्या प्रति असलेलं उत्तरदायित्व ही व्यवस्था कसं काय स्वीकारेल? उलट, विधिमंडळातल्या चर्चेला, प्रक्रियेला डावलण्याने काहीच फरक पडत नाही. ते महत्त्वाचं नाहीच, असाच संदेश यातून दिला जात आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत आपण या खूप धोक्याच्या वळणावर येऊन पोहोचलो आहोत.

आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींना वेळोवेळी जाब विचारण्याची, त्यांच्या कारभारावर लक्ष ठेवून त्यात आपल्या इच्छाआकांक्षांचं प्रतिबिंब पडत आहे, ही खबरदारी घेण्याची रीतच आपल्या समाजात रुजलेली नाही. आणि निर्वाचित प्रतिनिधींना परत बोलावण्याची तरतूदही नाही. अशा वेळी, जनतेने तिच्या प्रतिनिधींच्या कामावर लक्ष ठेवण्याचे मार्ग अस्पष्ट राहतात. आम्ही, म्हणजेच 'संपर्क' संस्था, लोकनिर्वाचित प्रतिनिधींच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेऊन तो जनतेसमोर मांडण्याचं काम करत असतो. एक प्रकारे, हा लोकसहभागच आहे. संसद आणि विधिमंडळं इथल्या कामकाजाचं थेट प्रक्षेपण सरकारी वाहिन्यांवरून होत असलं, संबंधित संकेतस्थळावर ते उपलब्ध असलं, तरी लोकप्रतिनिधींपैकी तिथल्या प्रक्रियेत कोण किती सहभागी होतं, कुठल्या भागातले प्रतिनिधी जास्त दक्ष असतात, जनतेच्या कोणत्या प्रश्नांची जास्त दखल घेतली जाते, असल्या प्रश्नांची उत्तरं त्या माहितीच्या समुद्रातून सहज हाती लागत नाहीत. आम्ही खटपट करून याच महासागरातून माहिती मिळवतो आणि तिचा अभ्यास करून ही उत्तरं शोधण्याचा करण्याचा प्रयत्न करतो. हा अभ्यास आहे, १५ व्या विधानसभा अधिवेशनांतल्या आमदारांच्या कामगिरीचा. मार्च २०२० ते मार्च-एप्रिल २०२२ या काळात, म्हणजेच कोविडसंकटाच्या छायेत महाराष्ट्र विधानसभेची एकूण सात अधिवेशनं झाली. यापैकी धोरणात्मक दृष्टीने महत्त्वाच्या तीन अर्थसंकल्पीय अधिवेशनांची निवड या अभ्यासासाठी केली. या तीनही अधिवेशनांत विचारल्या गेलेल्या सर्व १,५९२ तारांकित प्रश्नांचा कोविडसह अनेक समस्याविषय केंद्रस्थानी ठेवून आम्ही अभ्यास केला. आम्ही एकंदर कामकाजाचा आढावा घेतला असला; तरी मुले, महिला यांसारखे समाजातले दुर्बल घटक आणि मानवविकास निर्देशांक कमी असलेले, म्हणजे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मागास असलेले जिल्हे आणि आरोग्य, शिक्षण यांसारखे समाजाच्या विकासासाठी निर्वाणीच्या महत्त्वाचे विषय, यांच्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. मागील, म्हणजे १४ व्या विधानसभेच्या कार्यकाळातल्या (२०१४-२०१९) अधिवेशनांमध्ये अर्धा तास चर्चा, लक्षवेधी सूचना व तारांकित प्रश्न, अशा तीनही आयुधांद्वारे विचारल्या गेलेल्या एकूण ९,८३५ प्रश्नांचाही आम्ही अभ्यास केला असल्याने तुलनेसाठी आमच्यापाशी विदा (डेटा) तयार आहे. या वेळी, आम्ही १,५९२ तारांकित प्रश्नांचं एकूण ५६ विषय-उपविषय यात वर्गीकरण केलं. हे वर्गीकरण करताना प्रशासकीय विभागही ध्यानात घेतले. यातले काही विषय एकमेकांशी जोडलेले आहेत. तरीही, या वर्गीकरणामुळे प्रश्नांचं, समस्यांचं स्वरूप आणि एकूण कल समजायला मदत झाली.

करोना विषाणूने केलेल्या विश्वव्यापी आक्रमणाने जगभर आरोग्याचे प्रश्न ऐरणीवर आले. महाराष्ट्र विधानसभेतही आरोग्याला प्राधान्य मिळालेलं दिसून येतं. राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांपैकी २६ जिल्ह्यांमधून विचारलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांची संख्या तर जास्त झालीच; एकंदर प्रश्नांमधील आरोग्यविषयक प्रश्नांचं प्रमाण २०१४-१८ या काळातल्या अधिवेशनांत विचारल्या गेलेल्या प्रश्नांच्या दुपटीहून अधिक झालं. ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांसंबंधीचे प्रश्न ३ टक्क्यांवरून १२ टक्क्यांवर गेले. तरीही आरोग्यविषयक जागृती राज्यभर सारखी नव्हती. सर्वात जास्त प्रश्न (३७) विचारले गेले ते मुंबई उपनगर जिल्ह्यातून. त्यानंतर क्रमांक आहे नागपूर (१७) व पुणे (११) या जिल्ह्यांचा. या काळात इतर कामकाज कोविडपुढे झाकोळलं गेलं. एकूण १,५९२ प्रश्नांमध्ये कोविडचा थेट संदर्भ १४३ वेळा आला आहे. २०२० मधलं अर्थसंकल्पीय अधिवेशन कोविडसंकटाच्या आगमनाची चाहूल लागल्याने १५ मार्चला तहकूब केलं होतं. या संकटाचे खरे परिणाम त्यानंतर झाले. म्हणूनच २०२१-२२ या वर्षांतल्या अधिवेशनांत विचारल्या गेलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचं प्रमाण वाढलं आहे.

जिल्ह्यांतून विचारल्या गेलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचं प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलं आहे. ही वाढ औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक, म्हणजे नऊपटींनी जास्त आहे. फक्त नागपूर, गडचिरोली व गोंदिया या विदर्भातल्या तीन जिल्ह्यांमध्ये गेल्या विधानसभेच्या तुलनेत आरोग्याची प्रश्नसंख्या कमी झाली आहे. कोल्हापूर, हिंगोली, भंडारा, वाशीम, परभणी आणि नंदुरबार या सहा जिल्ह्यांमधून आरोग्यविषयक एकही प्रश्न विचारला गेला नाही. कोविडमुळे 'आरोग्य' या विषयाकडे जगभर सर्वांचं लक्ष वेधलं गेलं. कोविडची साथ इतक्या वेगाने पसरली आणि विकसित राष्ट्रांमध्ये तुलनेने जास्त हानीकारक ठरली, की यापुढे अशी हानी टाळायची असेल, तर आपापल्या राष्ट्रापुरता, खंडापुरता विचार करून चालणार नाही, साऱ्या जगाचंच आरोग्य सुधारावं लागेल, हा विचार पुढे आला. महाराष्ट्राच्या विधिमंडळात याचे पडसाद अवश्य उमटले. या अभ्यासाअगोदर, कोविडकाळातच आम्ही केलेल्या आमदारांच्या सर्वेक्षणात आरोग्यव्यवस्था सुधारणं हाच प्राधान्यक्रम असल्याचं ७५ टक्के आमदारांनी सांगितलं होतं. त्यांच्या या मताचं प्रतिबिंब विधानसभेतल्या आरोग्यविषयक प्रश्नांत जरूर दिसलं आहे. मात्र, त्यांच्या या सांगण्याचं रूपांतर कृतीमध्ये होण्यासाठी बरंच काही करावं लागणार आहे. ही जाणीव लोकप्रतिनिधींपासून नागरिकांपर्यंत सगळ्यांनीच ठेवायला हवी.

मागच्या विधानसभेत अल्प मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमधून सर्वात कमी प्रश्न विचारले गेले होते; त्या स्थितीत आताही फरक पडलेला नाही. त्या नऊ जिल्ह्यांमधून (उत्तर महाराष्ट्रातले नंदुरबार (०.६०४) आणि धुळे (०.६७१) हे दोन. विदर्भातले गडचिरोली (०.६०८) आणि वाशीम (०.६४६) हे दोन. मराठवाड्यातले हिंगोली (०.६४८), उस्मानाबाद (०.६४९), नांदेड (०.६५७), जालना (०.६६३), लातूर (०.६६३) हे पाच) आलेल्या प्रश्नांची १९६ ही संख्या मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे या तीन जिल्ह्यांच्या एकूण ३८८ या प्रश्नसंख्येच्या निम्मी आहे.

आरोग्याखालोखाल कोविडने शिक्षण क्षेत्राला मोठा फटका दिला. बालकांची शाळेत प्रत्यक्ष उपस्थिती कठीण झाल्यावर ऑनलाइन पर्यायाने त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न झाला. याची नोंद घेतली आहे, असं शिक्षणविषयक प्रश्नांतून दिसलं नाही.

• • •

# कबड्डीपटूंची कोटीच्या कोटी उड्डाणे



## प्रो-कबड्डी लीगच्या नवव्या हंगामाच्या लिलावात चार खेळाडू करोडपती

प्रो-कबड्डी लीगच्या नवव्या हंगामातील खेळाडूंच्या लिलावात चार कॅटेगरी मिळून पाच खेळाडूंना एक कोटीहून अधिक रुपयांची बोली लागली. त्यात पहिल्या दिवशीच्या चढाईपटू पवन सेहरावत (२.२६ कोटी, तमिळ थलैवाज्) आणि विकास कंडोला (१.७० कोटी, बंगळूरु बुल्स) आणि डिफेंडर इराणचा फझेल अत्राचेली (१.३८ कोटी, पुणेरी पलटन) यांच्यासह दुसऱ्या दिवशीच्या ब कॅटेगरीतील रेडर गुमन सिंग याचा (१.२१ कोटी, तमिळ थलैवाज्) समावेश आहे. करोडपती 'चौकडी'मधील तीन कबड्डीपटू भारतीय आहेत.

पहिल्या दिवशी, शुक्रवारी एलिट गटामध्ये पवन सेहरावत याला तमिळ थलैवाज् संघाकडून २ कोटी आणि २६ लाख रुपयांची बोली लागली. प्रो-कबड्डी लीगच्या इतिहासातील ही आजवरची विक्रमी बोली आहे. पहिल्या दिवशी सर्वाधिक बोली लागण्यामध्ये चढाईपटू विकास कंडोला याने दुसरा क्रमांक मिळवला. त्याच्यासाठी बंगळूरु बुल्सनी १ कोटी ७० लाख रुपये मोजले.

दुसऱ्या दिवशी शनिवारीही खेळाडूंना करारबद्ध करण्यासाठी मोठी चुरस पाहायला मिळाली. परदेशी खेळाडू फजल अत्राचली याच्यासाठी पुणेरी पलटनची १ कोटी ३८ लाखांची बोली निर्णायक ठरली. ए कॅटेगरीमध्ये रेडर प्रदीप नरवाल (९० लाख, यूपी योद्धाज्) हा करोडपती होण्यापासून केवळ १० लाख रुपये दूर राहिला. ब कॅटेगरीमध्ये रेडर गुमन सिंग याला यू मुंबा संघाने १.२१ कोटी रुपयांमध्ये करारबद्ध केले. याच कॅटेगरीतील दुसऱ्या क्रमांकावर डिफेंडर सुनील कुमार आहे. त्याला जयपूर पिंक पँथर्सनी ९० लाखांची बोली लावली. क कॅटेगरीमध्ये सर्वात जास्त बोली मिळवण्यात डिफेंडर अमीरहोसेन बास्तामी आघाडीवर राहिला. हरयाणा स्टीलर्सनी त्याला ६५.१० लाख रुपयांमध्ये करारबद्ध केले.

खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत खेळलेल्या जय भगवान याला प्रो-कबड्डी लीगमध्ये स्थान मिळाले. यू मुंबा संघाने त्याला १० लाख रुपयांमध्ये करारबद्ध केले. नवव्या हंगामामध्ये खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळलेल्या २४ कबड्डीपटूंना लिलावात सहभागी करून घेण्यात आले होते. यंदाच्या हंगामातील लिलाव प्रक्रियेत पाचशेहून अधिक कबड्डीपटूंचा समावेश होता.

चार खेळाडूंना एक कोटीहून अधिक बोली लागल्यानंतर मशाल स्पोर्ट्सचे सीईओ आणि लीग कमिश्नर अनुपम गोस्वामी यांनी आनंद व्यक्त केला आहे. प्रत्येक हंगामात खेळाडूंची बोली वाढत चालली आहे. ही सुरुवात आहे. लीगचा वाढता प्रचार आणि प्रसार याचे हे द्योतक आहे. दहाव्या हंगामात करोडपती कबड्डीपटूंची संख्या आणखी पाहायला मिळेल, असे ते म्हणाले.



# आरएसटी, अफेक स्कूल आघाडीवर

## सुरेश आचरेकर स्मृती बुद्धिबळ

आयडियल स्पोर्ट्स ॲकॅडमीतर्फे अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित क्रीडाप्रेमी स्व. सुरेश आचरेकर स्मृती १४ वर्षांखालील आंतर शालेय सांघिक बुध्दिबळ स्पर्धेत आरएसटी सेकंडरी स्कूल-गोवंडी व अफेक इंग्लिश स्कूल-चेंबूर संघांनी अ विभागात साखळी ३ गुणांसह आघाडी घेतली. गोवंडी येथील श्री हशू अडवाणी मेमोरियल स्कूलच्या सहकार्याने सुरू झालेल्या साखळी फेरीच्या सामन्यात आरएसटी सेकंडरी स्कूलने बलाढ्य अफेक इंग्लिश स्कूलला बरोबरीत रोखून बाद फेरीमधील आव्हान जिवंत ठेवले.

उद्घाटनप्रसंगी मुख्याध्यापिका संध्या ठाकूर, प्रिन्सिपल अश्विनी प्रधान, मुख्याध्यापिका अनिता केणी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण, क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक, माधवी कदम, प्रॉमिस सैतवडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पहिल्या साखळी सामन्यात श्री हशू अडवाणी मेमोरियल स्कूल संघाला अफेक इंग्लिश स्कूलने २-१ असे तर आरएसटी सेकंडरी स्कूलने लिंबोणीबाग मनपा शाळेला २-१ असे चकवून साखळीत दोन गुण वसूल केले. दोन्ही विजयी संघ दुसऱ्या फेरीच्या साखळी सामन्यात समोरासमोर आल्यामुळे लढत रंगतदार झाली. आरएसटी स्कूलच्या शर्वरी बंडगरने श्रीयश मोहितेला शह दिल्यावर अफेक स्कूलच्या ओमकार कटकेने तेजस पाटीलच्या राजाला शरण येण्यास भाग पाडून १-१ अशी बरोबरी साधली. त्यामुळे अफेकचा अजिंक्य वाघ विरुद्ध आरएसटीचा यश पाटील यांच्यामध्ये निर्णायक तुंबळ युद्ध रंगले. अखेर दोघांनीही डाव बरोबरी मान्य केल्यामुळे लढत समान गुणांवर राहून दोन्ही स्कूलने दुसऱ्या फेरीनंतर प्रत्येकी साखळी तीन गुणांसह संयुक्त आघाडी घेतली. ब विभाग शालेय बुध्दिबळ संघाच्या साखळी लढती ८ ऑगस्ट रोजी भायखळा येथील अंटोनियो डिसोझा हायस्कूल सभागृहात होणार आहेत.

# कोल्हापूरला नमवत मुंबईला जेतेपद

## 'विफा' आंतर-जिल्हा फुटबॉल स्पर्धा

फॉर्मात असलेल्या मुंबई जिल्हा संघाने प्रतिष्ठेच्या 'विफा' आंतर-जिल्हा फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद पटकावले. पालघर येथे झालेल्या स्पर्धेच्या चुरशीच्या अंतिम लढतीत शनिवारी त्यांनी कोल्हापूर जिल्हा संघावर ३-२ असा विजय मिळवला.

मुंबई संघ जेतेपदासाठी प्रबळ दावेदार असला तरी कोल्हापूरने सहजासहजी हार पत्करली नाही. त्यामुळे शेवटच्या मिनिटापर्यंत सामना रंगला. दोन गोल पूर्वार्धात झाले. उत्तरार्धात तीन गोलची नोंद झाली. स्ट्रायकर आकांक्षा कांदळकर हिने दहाव्या मिनिटाला मुंबई संघाचे खाते उघडले. त्यानंतर २६व्या मिनिटाला भाग्यश्री दळवी हिने त्यात भर घातली. मध्यंतरापर्यंत मुंबईकडे २-० अशी आघाडी होती. मध्यंतरानंतर कोल्हापूरने खेळ उंचावला. ५३व्या मिनिटाला सानिका पाटील हिने प्रतिस्पर्ध्यांची बचावफळी भेदताना आघाडी कमी केली. निर्धारित वेळ संपायला एक मिनिट शिल्लक असताना आर्या मोरे हिने अप्रतिम गोल करताना कोल्हापूरला २-२ अशी बरोबरी गाठून दिली. जेतेपदाची कोंडी फोडण्यासाठी टायब्रेकरचा अवलंब करावा लागणार, असे वाटत असतानाच हर्षिका जैनने कोल्हापूरचा बचाव मोडून काढला आणि मुंबईला ३-२ असे आघाडीवर नेले. तिचा गोल निर्णायक ठरला.

त्यापूर्वी, शुक्रवारी झालेल्या उपांत्य फेरीतील लढतीत मुंबई जिल्हा संघाने नागपूर संघाचा ४-० असा धुव्वा उडवला. दुसऱ्या रंगतदार लढतीत कोल्हापूर संघाने पुणे संघाचे आव्हान २-१ असे मोडीत काढले.



# इडूआर्डो कॅरेरा एफसी गोवाचे गोलकीपर प्रशिक्षक

**मुंबई :** एफसी गोवा क्लबचे नवे गोलकीपर प्रशिक्षक म्हणून इडूआर्डो कॅरेरा यांची नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती २०११-१३ हंगामासाठी आहे. ३९ वर्षीय कॅरेरा हे यूइफा ए लायसन्स होल्डर आहेत. त्यांनी स्पेन आणि चीनचे प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे.



कॅरेरा यांनी १९९३ ते २००१ या कालावधीमध्ये बार्सिलोना एफसी ॲकॅडमी आणि रिझर्व्ह संघाचे प्रतिनिधित्व केले. त्यानंतर निवृत्तीपर्यंत स्पेनच्या लोअर टीममध्ये खेळाडू म्हणून कार्यरत होते.

कॅरेरा हे ११९७ ते २००० या काळात स्पेनचा राष्ट्रीय संघ तसेच कॅटालोनिया निवड समिती संघाचा भाग होते. २००० मध्ये झालेल्या स्पर्धेत ते युइफा १६ वर्षांखालील स्पेन संघातूनही खेळले होते.

खेळाडू असतानाच इडूआर्डो हे बार्सिलोना ॲकॅडमीशी जोडले गेले. अमेरिका आणि डॉमिनिकन रिपब्लिक येथे कॅटालन क्लबचे गोलकिपिंग कोच म्हणून जॉईन होण्यापूर्वी चीनमध्ये चायनीज फुटबॉल असोसिएशनच्या युवा टॅलेंट अकादमीला मार्गदर्शन केले.

# नागपूरमध्ये विद्यार्थ्यांनी भरलेली स्कूल व्हॅन नाल्यात पडून अपघात!

## 18 विद्यार्थी थोडक्यात बचावले



नागपूर : नागपुरात स्कूल बसचा अपघात झाला. स्कूल व्हॅन नाल्यात पडली. मात्र या अपघातावेळी स्कूल व्हॅनमध्ये विद्यार्थी देखील होती. मात्र थोडक्यात या व्हॅनमधील विद्यार्थी सुखरुप बचावलेत. नागपूरच्या बेसा परिसरातील नाल्यावर व्हॅनचा हा अपघात झाला आणि व्हॅन नाल्याचया किनाऱ्यावर घुसली. यात दोन मुलं किरकोळ जखमी झाली असून इतर सर्व मुलं बालंबाल बचावली आहेत. स्कूल व्हॅनच्या अपघातामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांचाही काळजाचा ठोका चुकला होता. दरम्यान, दोन मुलं यात किरकोळ जखमी झाली असून इतर सर्वजण सुरक्षित आहेत. पोलीस या अपघातस्थळी दाखल झाले असून पुढील कारवाई केली जातेय. व्हॅनचं स्टेअरींग लॉक झाल्यामुळे हा अपघात घडला असावा, अशी प्राथमिक माहितीही समोर आली आहे. या अपघातामुळे विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल व्हॅनचा प्रश्नही पुन्हा एकदा अधोरेखित झालाय. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या व्हॅनमध्ये 21 विद्यार्थी व्हॅनमध्ये होते. आम्ही स्वतः 16 विद्यार्थ्यांना वाचवलं, असंही मदत करणाऱ्या लोकांनी सांगितलंय. 14 विद्यार्थ्यांना स्थानिकांनीच सुरक्षित बाहेर काढलं. त्यानंतर पालकांकडे या विद्यार्थ्यांना सोपवण्यात आलं. दरम्यान, या मार्गावर होणाऱ्या अपघाताच्या भीतीपोटी आम्ही वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत, असं स्थानिकांनी म्हटलंय. शाळेच्या दहा ते बारा विद्यार्थ्यांना बसवण्याची क्षमता व्हॅनमध्ये आहे.

# भूतबाधा झाल्याच्या शंकेने आईबापाकडून मुलीला मारहाण

## सहा वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू

नागपूरः आपल्या सहा वर्षीय मुलीला भूतबाधा झाल्याच्या शंकेने आई-वडिलांनी मुलीची भूतबाधेतून मुक्तता करण्याच्या नावाखाली तिला जबर मारहाण केली.या जबर मारहाणीत त्या सहा वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. या संदर्भात प्रतापनगर पोलिस स्ठानकात गुन्हा दाखल करत आरोपींना अटक केली आहे.

नागपूरच्या सुभाष नगर परिसरात राहणाऱ्या सिध्दार्थ चिमणे व त्याची पत्नी रंजना चिमणे यांना सहा वर्षीय मुलगी होती. गेले काही दिवसांपासून मुलीची अवस्था, सतत आजारी राहणे आणि तिचे हावभाव लक्षात घेऊन तिला भूतबाधा झाल्याची चिमणे दांपत्यांना शंका होती. एका भोंदू बाबाच्या सल्ल्याने त्यांनी तिच्यावर वेगवेगळे उपचार सुरू केले होते. मात्र त्याचा काहीच फायदा होत नव्हता. याला कंटाळून शुक्रवार आणि शनिवारच्या दरम्यानच्या रात्री चिमणे दांपत्य आणि त्यांच्या एका महिला नातेवाईकाने घरातच भूत बाधेतून मुक्त करण्याच्या नावाखाली सहा वर्षीय मुलीला बेल्ट आणि हाताने जबर मारहाण केली. चिमुकली जबर मारहाण सहन करू शकली नाही आणि निपचित पडली.

मेडीकलच्या आवारात मृतदेह सोडून पसार

घाबरलेल्या आई-वडिलांनी लगेच तिला



घेऊन रुग्णालयाकडे धाव घेतली. मात्र उपचारा पूर्वीच मुलीचा मृत्यू झाला होता. आरोपी आई-वडील एवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी आपण पकडले जाऊ या भीतीने मुलीचे मृतदेह शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या आवारात ठेवून तिथून पळ काढले. मात्र, रुग्णालयाच्या आवारात एका लहान मुलीचे मृतदेह बेवारस असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

**पोलिसांनी लावला पालकांचा शोध**

त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्हीच्या माध्यमातून तपास करत हे मृतदेह या ठिकाणी कोणी आणून ठेवले याची माहिती मिळवली. मृतदेह कोणत्या गाडीतून त्या ठिकाणी आणण्यात आले त्या गाडीच्या क्रमांकावरून पोलिसांनी आरोपींचा शोध लावला आणि हा संतापजनक प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आरोपी वडील सिद्धार्थ चिमणे, आई रंजना चिमणे आणि रंजनाची बहीण या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.







# आश्रमशाळेत 13 वर्षांच्या मुलीवर अत्याचार, अधीक्षकाला अटक



चंद्रपूर/वर्धा - आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या 13 वर्षीय मुलीवर 53 वर्षीय अधिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. भद्रावती तालुक्यातील बरांज या गावातील ही खासगी आश्रमशाळा आहे. या प्रकरणात वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर चंद्रपूर पोलिसांकडे तपास वर्ग करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अरविंद साळवे यांच्या निर्देशानुसार हा तपास वरोऱ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी नोपाणी यांच्या नेतृत्वात तपास सुरू करण्यात आला आहे. त्यानुसार अधिक तपासासाठी विशेष तपास पथक नेमण्यात आले आहे. संजय एकनाथ इटनकर असे या आरोपी अधिक्षकाचे नाव असून त्याच्यावर बाललैंगिक छळ कायदा (पॉक्सो), एट्रोसिटी एक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. पीडित मुलीची नागपूर येथे वैद्यकीय तपासणी केली जात आहे. हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत धक्कादायक प्रकरण - आठवी वर्गात शिक्षण घेणाऱ्या १३ वर्षीय मुलीवर चंद्रपूर जिल्ह्याच्या भद्रावती तालुक्यातील एका खासगी आश्रम शाळेतील अधीक्षकाने लैंगिक अत्याचार करून पेशालाच काळीमा फासले आहे. हे धक्कादायक प्रकरण हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी उघडकीस आली आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आरोपी आश्रम शाळेतील अधीक्षक संजय एकनाथ इटनकर ( वय- 53 ) याच्याविरुद्ध अत्याचाराच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पण घटनास्थळ चंद्रपूर जिल्ह्याच्या भद्रावती पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याचे हे प्रकरण पुढील तपासासाठी भद्रावती पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. वैद्यकीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविले - मुलीला चांगले शिक्षण मिळावे. या हेतूने पीडितेच्या आई- वडिलांनी तिला चंद्रपूर जिल्ह्याच्या भद्रावती तालुक्यातील एका खासगी आश्रम शाळेत ७ जुलै रोजी टाकले. पण हिंगणघाट येथील एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या पीडितेच्या वडिलांना ४ ऑगस्टला तुमच्या मुलीची प्रकृती खराब आहे, तिला व तिचा शाळा सोडल्याचा दाखला तुम्ही घेऊन जा, असे शाळेतून सांगण्यात आले. पण सततच्या पावसामुळे पीडितेचे वडील आश्रम शाळेत थोडे उशीराच पोहोचले. मुलीला सोबत घेऊन हिंगणघाटला परतल्यावर १३ वर्षीय मुलीवर ५३ वर्षीय अधीक्षकांने लैंगिक अत्याचार केल्याचे पुढे आले.







हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898